# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### औरंगाबाद येथे क्रीडा विद्यापीठ उभारण्याबाबत

**(१) ४२३१ (०९-०९-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे संपादित केलेल्या जागेवर क्रीडा विद्यापीठ होणार असल्याची घोषणा मा.क्रीडा मंत्री यांनी माहे मार्च, २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रीडा विद्यापीठाच्या कामाचा डीपीआर तयार करण्यासाठी शासनाने एजन्सी नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय, उक्त कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२७-०६-२०२२) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या धोरणानुसार क्रीडा विद्यापीठासाठी १५० ते २०० एकर जागा आवश्यक असल्यामुळे तसेच जागा उपलब्धता सोयी सुविधा निर्मिती याकरिता

लागणाऱ्या कालावधीचा विचार करता पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मोठीजुई ग्रामपंचायत (ता.उरण, जि.रायगड) हद्दीतील खारफुटीची झाडे बेकायदेशीररित्या तोडल्याबाबत

**(२) ८९९९ (११-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोठीजुई ग्रामपंचायत (ता.उरण, जि.रायगड) हद्दीतील खारफुटीची झाडे तोडून शासकीय जमीन बळकावणाऱ्या टोळीस विरोध करणाऱ्या एका सामाजिक कार्यकत्यास सदर टोळीने मारहाण केली असून खारफुटीची झाडे तोडणाऱ्या टोळीवर उरण तालुक्यातील वन खाते कोणतीही कारवाई करित नसल्याने जमिनी बळकावण्याचे प्रकार वाढत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण पूर्व भागातील शासकीय जमिनीवर कब्जा मिळविण्यासाठी उरण तहसिल कार्यालयातील अधिकारी, उरण वन परिवेक्षक अधिकारी व कर्मचारी यांचेशी आर्थिक संगनमत करुन भूमाफियांनी मौजे मोठीजुई येथील सर्वे क्रमांक ९५ आगराच्या साडेबारा हे. जमिनीवरील खारफुटी झाडे विनापरवानगी तोडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उरण तालुक्यातील खारफुटी झाडे तोडणाऱ्या दोषींवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (२७-०५-२०२२) :** (१) उपवन संरक्षक यांच्याकडील अहवालानुसार हे अंशत: खरे आहे.

(२) उपवन संरक्षक अलिबाग यांच्याकडील अहवालानुसार हे खरे नाही.
(३) तहसिलदार उरण यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे वनपरीक्षेत्र अधिकारी उरण यांच्या वतीने कांदळवन तोडीबाबत ३ आरोपींवर पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत पोलीस स्टेशन उरण येथे गुन्हा दाखल केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरेड व नागपूर (जि.नागपूर) येथील खेळांची मैदाने खेळाडूंसाठी पूर्णवेळ खुली करण्याबाबत

**(३) ११०५९ (०५-०१-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड व नागपूर (जि.नागपूर) येथील खेळांची मैदाने कोरानाचा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे खेळाडूंसाठी खुली करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेळेचे बंधन घातल्याने खेळाडूंना सराव करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खेळांच्या मैदानांबाबत शासनाने निर्णय घेऊन मैदाने खेळाडूंसाठी पूर्णवेळ खुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२७-०६-२०२२) :** (१) कोरोनाचा प्रादूर्भाव कमी झाल्यानंतर खेळांची मैदाने टप्याटप्याने खुली करण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.
(३) महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०२२ च्या शासन आदेशान्वये सर्व मैदाने खेळाडूंसाठी पूर्ण वेळ खुली करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा शिक्षणाधिकारी कार्यालयातील वेतन अधीक्षक शिक्षकांची फसवणूक करीत असल्याबाबत

**(४) ११३०० (०६-०१-२०२२) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा शिक्षणाधिकारी कार्यालयातील वेतन अधीक्षक वैद्यकीय देयकांची प्रतिपूर्ती व अनियमितता तसेच सातव्या वेतन आयोगाचे थकीत हप्ते व इतर कार्यालयीन कामकाजास विलंब करून शिक्षकांची आर्थिक फसवणूक करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात अनेक लोकप्रतिनिधींनी संबंधित मंत्री महोदयांकडे चौकशीसाठी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२९-०६-२०२२) :** (१) सदर प्रकरणी विलंब झाला आहे हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्या स्तरावर विचारधीन आहे.

---

## अमरावती शहरालगत रिंगरोडचे रुंदीकरण करणेबाबत

**(५) १२२७३ (३०-०३-२०२२) श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरालगत रिंगरोडचे बांधकाम लालखाडी ते नागपूर महामार्गापर्यंत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर रोडवरुन शहरात येणारी वर्दळ वाढली असल्यामुळे सदर रस्त्याचे रुंदीकरण करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अमरावती शहरालगत रिंगरोडचे रुंदीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२८-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

मा.श्री.प्रविण पोटे पाटील, वि.प.स. यांनी दिनांक २४/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये रहाटगाव ते राजपूत धाबा पर्यंत जाणाऱ्या रिंग रोडचे मजबुतीकरण करुन चौपदरी करण्याकरीता नविन अर्थसंकल्पात निधीची तरतुद करण्याबाबत निवेदन दिले आहे.
(३) सदर रस्त्याची पुढील १५ वर्षाची वाहतूक वर्दळ लक्षात घेता ५.५० मी. धावपट्टीचे ७.०० धावपट्टीसाठी (२x२.५ मी. रुंद स्कंधासह) नुकतेच रुंदीकरण झालेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भोकर (जि.परभणी) शहराला लागून असलेल्या गट क्र. २०७, २०८, २०९ क्षेत्राची ईटीएस मोजणी परवानगीच्या सत्यप्रती, रॉयल्टीच्या सत्यप्रती देण्याबाबत

**(६) १२२९० (३०-०३-२०२२) श्री.विप्लव बाजोरिया** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.परभणी) शहराला लागुन असलेल्या गट क्र. २०७, २०८, २०९ क्षेत्राची ईटीएस मोजणी करण्याचा अहवाल संबंधित मंडळ अधिकारी यांनी पाठविला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील भोकर शहराला लागुन असलेल्या गट क्र. २०७, २०८, २०९ क्षेत्रातील मुरुम उत्खननाची परवानगी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्हयातील भोकर तालुक्यातील क्षेत्रांमध्ये मुरुम उत्खनन करण्यासाठी किती परवानगी देण्यात आल्या, परवानगीच्या सत्यप्रती, रॉयल्टीच्या सत्यप्रती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२८-०६-२०२२) :** (१), (२) व (३) मौजे भोकर, ता.भोकर येथील गट क्र.२०९ या स्थळाची ईटीएस मोजणी करण्याबाबत मंडळ अधिकारी, भोकर यांनी दिनांक १२/१२/२०२१ च्या पत्रान्वये तहसिलदार यांना अहवाल सादर केला आहे. मौजे भोकर येथील गट क्र.२०७ व २०९ मध्ये मुरूम या गौण खनिज उत्खनन करण्यासाठी एकूण २० तात्पुरते परवाने निर्गमित करण्यात आले आहेत.

तर, मौजे भोकर येथील गट न.२०७, २०८ व २०९ वगळता भोकर तालुक्यातील इतर क्षेत्रांमधून मुरुम उत्खनन करण्यासाठी एकूण ६६ परवाने निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच भोकर तालुक्यात परवानगीच्या सत्यप्रती, रॉयल्टीच्या सत्यप्रती, यांची मागणी अर्जदाराकडून झाल्यास नियमाप्रमाणे नक्कल फी आकारून त्यांना मागणी नुसार सत्यप्रत पुरवण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महावितरण विभागांतर्गत कोकण, पूणे, नागपूर या प्रादेशिक कार्यालयातील प्रभारी असलेली पदे नियमित करून भरणेबाबत

**(७) १२३५४ (३०-०३-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरण विभागांतर्गत कोकण, पूणे, नागपूर या प्रादेशिक कार्यालयातील महत्वाच्या प्रमुख पदासह व्यवस्थापकीय संचालक व प्रादेशिक संचालक ही पदे प्रभारी म्हणून काम करीत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर महावितरण विभागात प्रभारी असलेली पदे नियमित करुन तातडीने नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२४-०६-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महावितरण कंपनीमध्ये कार्यकारी संचालक/ प्रादेशिक संचालकाची एकूण ८ पदे मंजूर असून त्यापैकी प्रादेशिक कार्यालय - औरंगाबाद व कोकण या ठिकाणी भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती शासनाकडून करण्यात येते. सद्य:स्थितीत औरंगाबाद व कोकण येथील प्रादेशिक संचालक हे पद भरलेले असून उर्वरित पुणे, नागपूर येथील प्रादेशिक कार्यालयातील पदांचा अतिरीक्त कार्यभार स्थानिक अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे. तसेच सांघिक कार्यालयाअंतर्गत समाविष्ट असलेल्या ४ पदांपैकी २ पदे भरलेली असून उर्वरित २ पदांचा अतिरीक्त कार्यभार महावितरण कंपनी मार्फत स्थानिक अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे.
(२) छोट्या संवर्गातील मागासवर्गियांकरीता आरक्षीत पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१/०८/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आली होती. सदर परिपत्रकास सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक २२/०८/२०१९ नुसार स्थगिती देण्यात आली आहे. सद्या छोट्या संवर्गातील सरळ सेवा पदे भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दती विहित करण्यात आली असून त्यानुसार महावितरण कंपनीतील रिक्त असलेली कार्यकारी संचालक व प्रादेशिक संचालकाची पदे भरण्याबाबतचा निर्णय महावितरण कंपनीस्तरावर घेण्याचे नियोजित आहे.
(३) लागू नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील एकलहरे येथील औष्णिक विद्युत केंद्र बंद करण्याबाबत

**(८) १२६४५ (३०-०३-२०२२) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकलहरे (जि.नाशिक) येथील औष्णिक विद्युत केंद्र बंद करण्याचा शासन स्तरावर विचार सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औष्णिक विद्युत केंद्र बंद केल्यानंतर तेथील यंत्रसामग्री व इतर पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) याचा उपयोग करून अन्य उद्योग सुरू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त जिल्ह्यातील औष्णिक विद्युत प्रकल्प बंद करुन अन्य उद्योग सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२२-०६-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नाशिक येथील २१० मे.वॅ. क्षमतेच्या तीन संचापैकी फक्त १ (संच क्र.५) हा भुसावळ येथील १x६६० मे.वॅ. प्रकल्पाचे सन २०२३-२०२४ मध्ये कार्यान्वयन झाल्यानंतर बंद करण्याचे प्रयोजन आहे.

(२) व (३) भविष्यात नाशिक औष्णिक विद्युत केंद्र बंद झाल्यास त्याठिकाणी उपलब्ध होणाऱ्या जमिनीच्या क्षेत्राचा विचार करुन तसेच नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांची तांत्रिक व आर्थिकदृष्टया पडताळणी करुन त्यावेळेस योग्य तो निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संजय गांधी निराधार अनुदान योजना व इतर योजनांच्या अनुदानापासून लाभार्थी वंचित असल्याबाबत

**(९) १२७०६ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार अनुदान योजना तसेच इतर योजनांतर्गत लाभार्थ्यांना दरमहा मिळणारे अनुदान अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,गत दिवाळी दरम्यान काही ठिकाणी प्राप्त अनुदानात योजनेच्या निकषानुसार दरमहा रुपये १,००० प्रमाणे दोन महिन्यांचे रुपये २,००० हे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा न होता त्याऐवजी रुपये १,४०० काही ठिकाणी रुपये १८०० याप्रमाणे अनुदान जमा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरमहा अनुदान नियमित न मिळण्याची तसेच प्राप्त अनुदान कमी - जास्त जमा होण्याची कारणे काय आहेत,

(४) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने प्राप्त अनुदानात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करून शासन लाभार्थ्यांचे उर्वरित अनुदान तातडीने जमा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-०६-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी, २०२२ पर्यंत अर्थसहाय्याचे वितरण करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या वनविभागातील वनपालांना वनपरिक्षेत्राधिकारी पदी पदोन्नती देण्याबाबत

**(१०) १२९७९ (३०-०३-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ९३४३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वनविभागात सरळसेवेतील १३४ वनपालांना वनपरिक्षेत्राधिकारी पदी पदोन्नती देण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर वन भवनात वनपालांच्या पदोन्नती संदर्भात माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये विभागीय पदोन्नती समितीची बैठक झाली होती, त्यानंतर वनपालांच्या पदोन्नतीची यादी वनविभागाकडे पाठविण्यात येऊन चार महिन्याचा कालावधी होऊनही सदरहू यादीस मंजूरी देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वनपालांना वनपरिक्षेत्राधिकारी पदी पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१६-०६-२०२२) :** (१), (२) व (३) वनक्षेत्रपाल, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा कोटयातून भरण्यासाठी वनपाल संवर्गातील कर्मचाऱ्यांना तदर्थ पदोन्नती देण्याकरीता दिनांक ३०/०८/२०२१ रोजी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), नागपूर यांचेस्तरावर पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली होती.

पदोन्नती समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग तसेच शासन मान्यता घेऊन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), नागपूर यांनी या कर्मचाऱ्यांना महसूल विभाग वाटप करुन दिनांक ०४/०५/२०२२ च्या आदेशान्वये या कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित केलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देवगड (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील पुल व जोडरस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(११) १३००६ (३०-०३-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील तारामुंबरी खाडीवरील इळये-वरंडवाडी ते जामसंडे-वळकू पाटेथरवाडी तसेच मिठमुंबरी-तारामुंबरी दरम्यानच्या खाडीवर पूल व देवगड - तारामुंबरी - मिठमुंबरी - कुणकेश्वर मार्गे कातवण - मिठबाव - आचरा - मालवण येथे पूल उभारण्याबाबत व जोडरस्ते तयार करण्यासाठी तत्कालीन शासनाने मंजूरी देऊन रुपये १५ लाखांची अर्थसंकल्पात तरतूद केल्यानंतरही सदरहू पूलाच्या उभारणीच्या कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवगड - तारामुंबरी - मिठमुंबरी - कुणकेश्वर - कातवण या संपूर्ण रस्त्याचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबतची मागणी श्री देव कुणकेश्वर देवस्थान ट्रस्ट (रजि.) यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदूर्ग जिल्हा, कार्यकारी अभियंता, कणकवली व उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देवगड यांचेकडे निवेदने सादर करुन तसेच प्रत्यक्ष भेट घेऊन केल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणी पूल उभारणीस व जोडरस्त्याच्या कामास होत असलेल्या विलंबामुळे पूल उभारणीचे काम व जोडरस्त्याच्या कामाच्या अंदाजित खर्चात वाढ होत असून पूल व जोड रस्त्याअभावी ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू पूल उभारणीचे व जोडरस्त्याची कामे पूर्ण करुन पूल वाहतूकीसाठी कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२४-०६-२०२२)** : (१) इळये वरंडवाडी या ग्रामीण मार्गावरील पुलाच्या जोडरस्त्यासाठी आवश्यक भूसंपादनकरीता प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

तारामुंबरी-मिठमुंबरी पुलाचे काम पूर्ण झाले असून पूल व जोडरस्ता जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

देवगड-तारामुंबरी-मिठमुंबरी-कुणकेश्वर मार्गे कातवण-मिठबाव-आचरा-मालवण येथील पोचमार्ग ४५० मी. लांबीत भूसंपादन करणे या कामास रुपये २००.०० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. भूसंपादन करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) तारामुंबरी-मिठमुंबरी खाडीवर पुलासाठी पोचमार्गाचे बांधकाम करणे या रक्कम रुपये २०० लक्ष मंजूर कामात ४५० मी. लांबीमध्ये जमीन मालकाने हरकत घेतल्याने काम स्थगित करावे लागले. या ४५० मी. लांबीमध्ये खडीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे व उर्वरीत लांबीत डांबरीकरण व मजबुतीकरण करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

जमीन मालकाने हरकत घेतलेल्या ४५० मी. लांबीत भूसंपादन करणे करीता रक्कम रुपये २०० लक्षचे काम मंजूर करण्यात आले असून, भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करुन सदर काम कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत सदर रस्त्यावर वाहतूक चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दुर्गम, आदिवासी आणि नक्षलग्रस्त अतिसंवेदनशील आश्रमशाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) १३०८९ (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्गम, आदिवासी आणि नक्षलग्रस्त अतिसंवेदनशील गावांमधील आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्त्यांसाठी शासनाने माहे नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान जाहिराती काढल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिसंवेदनशील गावामधील आश्रमशाळेतील शिक्षकांची सर्वच पदे तासिका तत्वावर असल्यामुळे या पदांसाठी बाहेरचे उमेदवार मिळतील काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू पदे तासिका तत्वावर न भरता नियमित भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०६-०६-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२० अन्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग व औषधी द्रव्य विभाग वगळता कोणत्याही विभागाने पदभरती प्रकिया राबविण्यात येऊ नये असे निर्बंध लावण्यात आलेले आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागांतर्गत सन २०१८ नंतर भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासनाच्या विविध विभागांची असमाधानकारक असलेली कामगिरी सुधारण्याबाबत

**(१३) १३१६७ (३०-०३-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या विविध विभागांकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा निर्धारीत वेळेत देण्याचे प्रशासनावर बंधन घालणारा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा कायदा दिनांक २८ एप्रिल, २०१५ पासून लागू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाच्या सन २०२०-२०२१ या वर्षाच्या वार्षिक अहवालानुसार कृषी, पर्यटन, सांस्कृतिक, परिवहन, वित्त, गृहनिर्माण व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वैद्यकीय शिक्षण, औषधी

द्रव्य, वन, पशुसंवर्धन, मत्स्य आणि पाणीपुरवठा या दहा विभागांची कामगिरी लाल श्रेणी (असमाधानकारक) गटात आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर विभागांची कामगिरी सुधारण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२०-०६-२०२२) :** (१) होय.

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी अंमलात आला आहे.
(२) होय, महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाच्या सन २०२०-२०२१ या वर्षाच्या वार्षिक अहवालानुसार कृषी विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, परिवहन विभाग, वित्त विभाग, गृहनिर्माण विभाग - झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, वन विभाग, पशुसंवर्धन विभाग, मत्स्य व्यवसाय विभाग, पाणीपुरवठा - महाराष्ट्र जिवन प्राधिकरण या दहा विभागांचे खालील निकषानुसार महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाकडून लाल श्रेणीत (असमाधानकारक कामगिरी) वर्गीकरण करण्यात आले आहे.

१) नागरीकांना सेवा देण्यासाठी “आपले सरकार” पोर्टलचा उपयोग नागरीकांनी करावा म्हणून विभागाकडून प्रयत्न नाहीत.

२) “आपले सरकार” पोर्टलशी एकत्रिकरण पूर्ण झाले आहे. परंतु सेवा व रक्कम प्रदान करण्यासाठी एकच व्यासपीठ (SINGLE PLATFORM) या धोरणाचे पालन केले जात नाही.

३) ऑनलाईन प्रणालीचा वापर न केल्यामुळे प्राप्त अर्ज व त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीवर सद्य:स्थितीची पडताळणी करणे शक्य नाही.
(३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाच्या २०२०-२०२१

च्या वार्षिक अहवालातील आयोगाने केलेल्या सूचना व शिफारशींनुसार कार्यवाही करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आलेले आहे.

---

## विदर्भातील नागपूर-अमरावती-अकोला-चंद्रपूर विमानतळाची विकास कामे पूर्ण करण्याबाबत

**(१४) १३४९३ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे अधिनस्थ विदर्भातील नागपूर-अमरावती-अकोला-चंद्रपूर येथील विमानतळाची विकास कामे सन २०१९ पासून बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूसंपदाची प्रक्रिया, वन विभागाच्या भूमीचे हस्तांतरण या सर्व प्रक्रिया पूर्ण करुन व निधी उपलब्ध करुन सदरहू विमानतळाची प्रलंबित विकास कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२१-०६-२०२२) :** (१) व (२) नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळातील, प्रवाश्यांच्या सोयीच्या दृष्टीने आवश्यक विकास कामे करण्यात आलेली आहेत.

अमरावती विमानतळाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

अकोला विमानतळावर सद्य:स्थितीत एटीआर-४२ किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेचे विमान उतरु शकेल.

चंद्रपूर विमानतळाच्या वन जमिनीच्या निर्वानिकरणाचा प्रस्ताव राज्य शासनाच्या वन विभागाकडून केंद्र शासनास न पाठविण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक २२/६/२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे पुढील भूसंपादनाची कार्यवाही तूर्तास स्थगित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ओबीसी, व्ही.जे., एन.टी., एस.बी.सी. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शुल्क परतावा देण्याबाबत

**(१५) १३४९५ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ गत २ ते ३ वर्षापासून प्राप्त झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ओबीसी, व्हिजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती व शुल्क परतावा न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, परतावा मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे या विद्यार्थ्यांना खाजगी महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी पूर्ण प्रवेश शुल्क भरावे लागत असल्याने शासन सदर परतावा तातडीने खाजगी महाविद्यालये तसेच वैद्यकीय महाविद्यालयांना अदा करणार आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ तातडीने अदा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२८-०६-२०२२) :** (१) नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा गुमगांव (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील वेणा नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(१६) १३५०४ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा गुमगांव (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील वेणा नदीवर सुमारे रुपये १० कोटी खर्चाच्या पूलाचे बांधकाम सन २०१८ मध्ये सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूलाच्या बांधकामास ३ वर्षे पूर्ण होऊनही अद्यापपर्यंत पूलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू पूलाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२४-०६-२०२२) :** (१) होय.

(२) माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये पूलाचे बांधकाम पूर्ण झाले असून, पुलावरील वाहतूक सुरळीत सुरु करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिम जमातीच्या नागरीकांसाठी असलेले घरकुलाचे उद्दीष्ट कायम ठेवून विधीची तरतूद करण्याबाबत

**(१७) १३५९३ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिम जमातींच्या आर्थिक दुर्बल नागरीकांसाठी आदिम जमाती विकास योजनेंतर्गत सन २०२१-२०२२ या वर्षासाठी ४,१४४ घरकुलांचे उद्दीष्ट शासनाने मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्दीष्टात कपात करून हे उद्दीष्ट ३,३९० घरकुलांचे करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिम जमातीच्या नागरीकांना घरकुलांची गरज असल्यामुळे शासनाने सदर उद्दीष्ट पूर्ववत कायम ठेवून निधीची तरतुद करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२२-०६-२०२२) :** (१), (२) व (३) सन २०२१-२०२२ मध्ये योजनेंतर्गत रुपये ५५००.०० लक्षच्या मर्यादेत संपूर्ण राज्यासाठी ४१४४ इतका घरकुलांचा लक्षांक देणेत आला. तथापि, अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर निधी उपलब्ध होण्यास मर्यादा येत असल्याचे निदर्शनास आल्याने रुपये ४५००.०० लक्षच्या मर्यादेत घरकुलांचा ३३९० इतका सुधारीत लक्षांक देणेत आला. मात्र, तद्नंतर सुधारित अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार योजनेस आणखी निधी उपलब्ध झाल्याने रुपये २४४६.४६ लक्षच्या मर्यादेत अतिरिक्त १८४२ घरकुले मंजूर करणेत आली असून सद्य:स्थितीत सन २०२१-२०२२ या सालामध्ये एकूण ५२३२ इतका घरकुलांचा लक्षांक मंजूर करणेत आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ८५० पोलीस उपनिरीक्षकांच्या पदोन्नत्या प्रलंबित असल्याबाबत

**(१८) १३६०९ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या पोलीस महासंचालक कार्यालयांतर्गत पदोन्नतीस पात्र राज्यभरातील ८५० पोलीस उपनिरीक्षकांच्या पदोन्नत्या मागील १० महिन्यांपासून देण्यात आल्या नाही, आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने संबंधित पदोन्नती करीता अपेक्षित असलेल्या सर्व प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रलंबित पोलीस उपनिरीक्षकांच्या पदोन्नत्या देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०२-०७-२०२२) :** (१) व (२) सदर मुद्यात उपस्थित केलेली बाब खरी नाही. पोलीस उप निरीक्षक भरती (नियम), १९९५ (सुधारीत दिनांक २९/०६/२०१३ अन्वये) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सरळसेवा ५०%, मर्यादीत विभागीय स्पर्धा परीक्षा २५% व स्थानापन्न पोलीस उपनिरीक्षक विभागीय २५% अशी तीन प्रकारे पोलीस उप निरीक्षकांची पदे

भरली जातात. सदरहू तीन कोट्यात ९८६० पदे मंजूर आहेत. त्यापैकी माहे डिसेंबर, २०२१ अखेर पर्यंची स्थानापन्न २५ टक्के पदोन्नती कोट्यातील सर्व रिक्त पदे अर्हता परीक्षा २०१३ उत्तीर्ण असलेल्या अंमलदारांना पोउपनि पदाची पदोन्नती देवून भरण्यात आलेली आहेत.

तसेच माहे जाने, २०२२ ते आजपर्यंत सदर कोट्यात केवळ २४४ पदे पदोन्नती सेवानिवृत्ती, मयत व इतर कारणाने रिक्त झालेली आहेत. सदर रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विभागाच्या १२१ आश्रमशाळा आदर्श आश्रम शाळेच्या धर्तीवर कार्यान्वित करण्याबाबत

**(१९) १३६१५ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागाच्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना उच्च आणि स्पर्धात्मक शिक्षण मिळावे या हेतूने १२१ आदिवासी आश्रमशाळा आदर्श आश्रम शाळा (मॉडेल आश्रमशाळा) म्हणून विकसित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मॉडेल आश्रमशाळा निर्मितीसाठी स्थापन केलेल्या समितीची अद्याप एकही बैठक झाली नसून निर्णयाची अंमलबजावणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आदिवासी विभागाच्या १२१ आश्रमशाळा ह्या मॉडेल आश्रमशाळेच्या धर्तीवर कार्यान्वित करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१५-०६-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या निवासी आश्रमशाळांपैकी १२१ आश्रमशाळा आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्यास विभागाच्या दिनांक २४/११/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

१२१ आदिवासी आश्रमशाळा आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्याचे संदर्भात गठीत करण्यात आलेल्या मार्गदर्शक समितीची आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/१२/२०२१ रोजी बैठक संपन्न झाली.

(३) विभागाच्या दिनांक ०२/०३/२०२२ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये ३० आश्रमशाळा आदर्श आश्रमशाळा म्हणून विकसित करण्यासाठीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील डोंगराळ भागात मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) २६५९६ (१९-०४-२०१७) श्री.सतेज उर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी, भुदगड, आजरा, शाहुवाडी, पन्हाळा, चंदगड गगनवावडा या तालुक्यांमध्ये डोंगराळ भागात अनेक वर्षापासून धनगर समाज राहत असून यापैकी राधानगरी तालुक्यातील १० गावातील १९ धनगरवाड्यात ४३० कुटूंबात २३०० धनगर महिला व पुरुष राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनखात्याच्या जाचक अटीमुळे या भागातील नागरीकांना वीज, पाणी, रस्ते, अंगणवाड्या इ. शासन सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने येथील धनगर समाजास शासन सुविधा मिळाव्यात यासाठी वसंतराव नाईक तांडा / वस्ती सुधार योजनेत समावेश करावा किंवा त्यातील तरतुदीप्रमाणे धनगरवाडा सुधार योजना सुरु करुन लोकसंख्येच्या प्रमाणातील दरडोई खर्चाची अट शिथील करुन जिल्हास्तरावर योजना मंजूरीचे अधिकार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१७-०६-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या तांडा व वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरवण्याकरीता सन २००३ पासून राज्यामध्ये वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेचा लाभ धनगर वाड्या / वस्त्यांनासुद्धा देण्यात येतो. शासन निर्णय दिनांक ३०/०१/२०१८ अन्वये सदर योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांमध्ये १) विद्युतीकरण, २) पिण्याचे पाणी, ३) अंतर्गत रस्ते, ४) गटारे, ५) शौचालये तसेच समाज मंदिर/वाचनालये व शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे या कामांचा समावेश आहे. तसेच सदर योजनेंतर्गत जिल्हास्तरीय समितीमार्फत प्राप्त प्रस्तावांवर शासनाच्या धोरणानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार शासन स्तरावरून निर्णय घेण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.